# शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था

चेहडी बु., सामनगांवरोड, नाशिक रोड, नाशिक-422101

दुरध्वनी क. (0253) 2461221, 2452912.
फॅक्स क. 2450236, 2461219

ई-मेल. - Email: office.gpnashik@dtemaharashtra.gov.in
वेबसाईट- www.gpnashik.ac.in


No.GPN/Convocation-2020/ 372 Date: 15 FEB 2020

## प्रेस नोट

### आयुष्यात येणाऱ्या संकटांना संधी समजून सामोरे जा. - अविनाश शिरोडे
### शासकीय तंत्रनिकेतनचा पदविका प्रदान समारंभ उत्साहात

शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेचा पदविका प्रदान समारंभ शनिवार दि.15 फेब्रुवारी 2020 रोजी उत्साहात संपन्न झाला.

विद्यार्थ्यांनी स्वतःची कल्पना शक्ती एखाद्या क्षेत्रापुरती संकुचित न ठेवता त्यांनी चौकटीबाहेर विचार करावा. आयुष्यात येणाऱ्या संकटांना संधी समजून सामोरे जावे. असे प्रतिपादन मा. श्री. अविनाश शिरोडे, माजी ऐरोस्पेस अभियंता, राष्ट्रीय अवकाश संशोधन संस्था (ISRO) यांनी शासकीय तंत्रनिकेतनच्या पदविका प्रदान समारंभाच्या दीक्षांत भाषणात केले. विद्यार्थ्यांनी स्वतःला जगात सुरु असलेल्या नवनवीन तंत्रज्ञानाबद्दल अद्यावत ठेवावे. तसेच त्यांनी जगात अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रात सध्या होत असलेल्या विविध संशोधनाबद्दल माहिती दिली.

समारंभास संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. सुरेशजी वाघ यांनी अध्यक्षीय भाषणातून भारताच्या उद्योग व्यवसाय विकासाची पार्श्वभूमी सांगितली. उद्योगजकता विकास व उपक्रमशीलता या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्योगजकता विकास करीता मनुष्यबळ विकास हा आवश्यक आहे. एखाद्या सफल उद्योजकाला लागणारी गुण-वैशिष्ठये त्यांनी सांगितली.

समारंभास संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य श्री.किशोर पाटील, श्री. शशिकांत जाधव, श्री. उमेशचंद्र दंडगव्हाळ, विविध उद्योग समूहातील प्रतिनिधी, इस्त्राईल येथील श्री. ॲरी ट्रिंकर व श्रीमती राया ट्रिंकर हे उपस्थित होते.

संस्थेचे परीक्षा नियंत्रक प्रा. प्रशांत जैन यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली व प्रास्ताविकातून संस्थेचे प्राचार्य प्रा. ज्ञानदेव नाठे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर केला.

समारंभामध्ये एकूण 679 विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात आल्या. संस्थेत शिकविल्या जाणा-या 10 अभियांत्रिकी शाखांच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी प्रथम व व्दितीय क्रमांकाने उत्तीर्ण गुणवंतांना सुवर्ण व रौप्य पदके प्रदान करण्यात आली.

समारंभात उन्हाळी परीक्षा 2019 मधील थोरात दुर्गेश राजेष, अहिरे मयुर लोटन, निकम रूतुजा रंजीत, पाटील योगेष्वरी गणेष, जमदाडे वैषाली विष्वनाथ, म्हस्के दिव्या गौतम, श्रावणी शरद चव्हाणके, श्रीमाळ दर्षन दिनेष, वाबळे शुभम अनिल, भुरे जुही पराग, दराडे शुभम तुकाराम, बच्छाव चेतना भास्कर, रणमाळे कोमल सुनिल हया विद्यार्थ्यांना त्यांच्या शाखेत प्रथम स्थान मिळविल्याबद्दल सुवर्ण पदकाने गौरविण्यात आले.

तसेच क्षत्रिय अभिशेक संजय, साखरे मयुरी परेष, वाघ वैश्णवी निषांत, गांगुर्डे कावेरी संपतराव, भोर धनश्री पोपट, राजगुरू अंकिता दिनेष, काळोखे प्रियंका बाळासाहेब, वसानी दिषा अनंत, दंडगव्हाळ अभिशेक गोकुळ, सैयदअली मेहदी झैडी, गायकवाड विजयभाई शिवाजी, जगताप वैश्णवी संजय, सोनवणे चिन्मय प्रमोद हया विद्यार्थ्यांना त्यांच्या शाखेत व्दितीय स्थान मिळविल्याबद्दल रौप्य पदकाने गौरविण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम विभागाने संस्थेमध्ये केलेल्या इमारत देखभालीच्या उत्तम कामाबद्दल उपविभागीय अभियंता श्री. चांगदेव सोनावणे व शाखा अभियंता श्री. सचिन शेळके यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. नितीन ठाकरे व प्रा. दिपाली किर्तने यांनी केले तर आभार प्रा. प्रमोद कोचुरे यांनी मानले.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

प्रा. ज्ञानदेव पुंडलिकराव नाठे
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन नाशिक

I:\Convocation 2020\Convocation Press Note After C.doc